सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा अद्यावतीकरण धोरणांतर्गत राज्य सुकाणू समितीची स्थापना करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : आयटीआय- २०२५/प्र.क्र. ८०/ संगणक क्र. ई-१०९९०९४/ व्यशि-३**
**दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : १४ मे, २०२६**

**संदर्भ** :- (१) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. पीपीपी-२०२५/प्र.क्र.८०/व्यशि-३ दि. ०२.६.२०२५
(२) शासनपत्र समक्रमांक दिनांक २६.८.२०२५
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र का. क्र. ०७/सीटीएस/Solar Energy/२०२६/२८५ दि. ४.५.२०२६

**प्रस्तावना :**

सार्वजनिक- खाजगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्यावतीकरण करण्याचे धोरण, २०२५ या धोरणास दिनांक २ जून, २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदरहू धोरणाची कार्यप्रणालीची मार्गदर्शक तत्त्वे (Operational Guidelines) संदर्भाधीन दिनांक २६.८.२०२५ च्या पत्रान्वये निर्गमित केले आहेत. सदर धोरणांतर्गत संबंधित आस्थापनांना शासकीय औद्योगिक संस्थांच्या अद्यावतीकरण करण्याकरिता सहभागी करुन घेवून उद्योगांच्या मागणीनुसार अद्यावत अभ्यासक्रम राबविणे शक्य होणार आहे. संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र. ३ अन्वये सार्वजनिक- खाजगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्यावतीकरण करणेच्या धोरणांतर्गत मित्र यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार (Operational Guidelines) राज्य सुकाणू समितीच्या रचनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

सार्वजनिक- खाजगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्यावतीकरण धोरणाअंतर्गत कार्यप्रणालीची मार्गदर्शक तत्त्वे मित्र (महाराष्ट्र इन्स्टिट्युट फॉर ट्रान्सफॉर्मेशन) यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेली आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ५ मधील (Point C) नुसार राज्यस्तरीय सुकाणू समितीची रचना, कर्तव्ये व जबाबदारी नमूद करण्यात आली आहे. त्याअनुसार राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | भूमिका |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई | सदस्य सचिव |
| ३ | प्रतिनिधी, महाराष्ट्र इन्स्टिट्युट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) | सदस्य |
| ४ | औद्योगिक संघटनांचे दोन प्रतिनिधी (CII/FICCI) | सदस्य |
| ५ | आयटीआय प्राचार्य (रोटेशनने) दोन सदस्य i)औ.प्र. संस्था, औंध (ii) औ.प्र. संस्था अंबरनाथ | सदस्य |
| ६ | प्रादेशिक सहसंचालक (दोन सदस्य) (नाशिक विभाग, मुंबई विभाग) | सदस्य |
| ७ | IMC अध्यक्ष (रोटेशनने) दोन सदस्य i) औ.प्र. संस्था, औंध (ii) औ.प्र. संस्था अंबरनाथ | सदस्य |
| ८ | उद्योग विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | वित्त विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| १० | निरीक्षण व मूल्यांकन तज्ञ (प्रशासकीय/लेखाअधिकारी) | विशेष निमंत्रित सदस्य |
| ११ | विषय तज्ञ (विशेष निमंत्रित) | विशेष निमंत्रित सदस्य |

उक्त राज्यस्तरीय सुकाणू समितीने मित्र यांच्या सहकार्याने तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा, उद्दिष्टे व भूमिका व जबाबदारी यांचा अवलंब करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५१४१७५०३३०९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=20B5439BF6337AC786ACB2D216DFFF86804484EB90F4D3512213F2618F39657E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11EB206D5E1B6D85776EB1F62A6FADEF79AFB18099A51B276758D0FFAA4C4F30, cn=AMEY ANIL GAWADE
Date: 2026.05.14 17:52:24 +05'30'

**( अमेय गावडे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई

३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक /छत्रपती संभाजीनगर /अमरावती/नागपूर/मुंबई/पुणे

५. निवड नस्ती. (व्यशि-३).